मुंबई विद्यापीठ

# UNIVERSITY OF MUMBAI

दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या

अधिसभेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

•

Minutes of the Ordinary Meeting of the Senate

held on 18th October, 2016.

मुंबई विद्यापीठ

# UNIVERSITY OF MUMBAI

दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या

अधिसभेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

•

Minutes of the Ordinary Meeting of the Senate

held on 18th October, 2016.

# मुंबई विद्यापीठ

क्र. ३-२०१६-२०१७

<u>अधिसभा</u>

१८ ऑक्टोबर, २०१६

अधिसभेची सर्वसाधारण सभा विद्यापीठाचे सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन येथे गुरूवार दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरू झाली. सभेमध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते -

१. डॉ. संजय व्ही. देशमुख (कुलगुरू)

२. डॉ. अनिल पाटील

३. डॉ.सुनिल पाटील

४. श्री. भुजंग कि. अहिरे

५. डॉ. दिलीप एस. पाटील

६. डॉ. एम. ए. खान, ( सदस्य सचिव)

७. डॉ. अनिल कर्णिक

८. डॉ. पी. एम. डोंगरे

९. डॉ. मंजिरी कामत

१०. श्री. मच्छिंद्रनाथ र. डोईफोडे

सभेची सुरूवात 'वंदे मातरम्' या गीताने झाली.

अधिसभेच्या कामकाजाला सुरवात करताना कुलसचिवांनी स्वत:च्या तसेच विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे हार्दिक स्वागत केले.

अभिनंदन

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम २५(२)(ज) नुसार डॉ. सुनिल पाटील यांची अधिसभेवर नेमणूक झाल्याबददल विद्यापीठ प्रशासनातर्फे व अधिसभेतर्फे त्यांचे स्वागत व अभिनंदन करण्यात आले.

त्यानंतर कुलसचिवांनी अलिकडच्या काळातील मान्यवर व्यक्तींच्या दु:खद निधनाबददल शोक व्यक्त करून पुढील शब्दात श्रध्दांजली वाहिली.

### श्री. जनार्दन परब

ज्येष्ठ रंगकर्मी श्री जनार्दन परब यांचे प्रदीर्घ आजारपणामुळे दिनांक ०२ एप्रिल, २०१६ रोजी निधन झाले.

### श्री. अंकुशराव टोपे

राष्ट्रवादीचे ज्येष्ठ व सहकार महर्षी माजी खासदार आणि माजी शिक्षण मंत्री राजेश टोपे यांचे वडील श्री अंकुशराव टोपे यांचे प्रदीर्घ आजारपणामुळे दिनांक ०३ एप्रिल, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७४ वर्षांचे होते.

### श्रीमती. माधवी करंदीकर

ज्येष्ठ समाजिक कार्यकर्त्या श्रीमती. माधवी करंदीकर यांचे प्रदीर्घ आजारपणामुळे दिनांक १२ एप्रिल, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६५ वर्षांच्या होत्या.

### श्रीमती. लीला कान्हेरे

ज्येष्ठ कलाकार श्रीमती. लीला कान्हेरे यांचे प्रदीर्घ आजारपणामुळे दिनांक २५ एप्रिल, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९४ वर्षांच्या होत्या.

### माजी आमदार श्री. हरिचंद्र पाटील

माजी आमदार श्री. हरिचंद्र पाटील यांचे आजारपणामुळे दिनांक १ मे, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६२ वर्षांचे होते.

### श्री. सुनिल जोशी

राज्य शासकीय कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस श्री सुनील जोशी यांचे हृदयविकाराने दिनांक ४ मे, २०१६ रोजी निधन झाले.

### श्री. प्रल्हाद छाब्रिया

फिनोलेक्स उद्योगसमूहाचे संस्थापक श्री. प्रल्हाद छाब्रिया यांचे वृध्दापकाळाने दिनांक ५ मे, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८६ वर्षांचे होते.

### कवी श्री. विलास भवार

रिपब्लिकन चळवळीतील नेता कवी श्री. विलास भवार यांचे आजारपणामुळे दिनांक ७ मे, २०१६ रोजी निधन झाले.

### श्री. बाळ राणे

लेखक साहित्यिक श्री बाळ राणे यांचे आजारपणामुळे दिनांक ११ मे, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते.

### श्री. बाबा हरदेवसिंग

संत निरंकारी मिशन या अध्यात्मिक संघटनेचे प्रमुख बाबा हरदेवसिंग यांचे अपघातात दिनांक १३ मे, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६२ वर्षांचे होते.

### ज्येष्ठ समीक्षक प्रा.रा.ग.जाधव

ज्येष्ठ समीक्षक - कवी प्रा.रा.ग.जाधव यांचे वृध्दापकाळाने दिनांक २७ मे, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते.

### श्री. रज्जाक खान

हास्यअभिनेते श्री. रज्जाक खान यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १ जुन, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६५ वर्षांचे होते.

### ज्येष्ठ अभिनेत्री सुलभा देशापांडे

ज्येष्ठ अभिनेत्री सुलभा देशापांडे यांचे प्रदीर्घ आजाराने दिनांक ४ जुन, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७९ वर्षांच्या होत्या.

### राज्याचे माजी पोलीस महासंचालक श्री. सुर्यकांत जोग

राज्याचे माजी पोलीस महासंचालक श्री. सुर्यकांत जोग यांचे आजारपणामुळे दिनांक १७ जुन, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते.

### श्री. रामभाऊ कुलकर्णी

ज्येष्ठ स्वयंसेवक श्री. रामभाऊ कुलकर्णी यांचे आजारपणामुळे दिनांक १९ जुन, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८१ वर्षांचे होते.

### श्रीमती. वीणा सहस्त्रबुध्दे

ख्याल–भजन गायकीत निष्णात असलेल्या ज्येष्ठ शास्त्रीय गायिका वीणा सहस्त्रबुध्दे यांचे आजारपणामुळे दिनांक २९ जुन, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६८ वर्षांच्या होत्या.

### ज्येष्ठ साहित्यिक, संशोधक डॉ. रा.चिं. ढेरे

ज्येष्ठ साहित्यिक, संशोधक, संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. रा.चिं.ढेरे यांचे दिर्घ आजारपणामुळे दिनांक १ जुलै, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षांचे होते.

### ज्येष्ठ दिग्दर्शक श्री. वाय.जी. भोसले

ज्येष्ठ दिग्दर्शक श्री वाय.जी. भोसले यांचे वृध्दापकाळाने दिनांक ४ जुलै, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते.

### ज्येष्ठ लेखिका, पत्रकार श्रीमती. वसुंधरा पेंडसे

ज्येष्ठ लेखिका,पत्रकार श्रीमती. वसुंधरा पेंडसे यांचे अल्पशा आजाराने दिनांक १५ जुलै, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६५ वर्षांच्या होत्या.

### ज्येष्ठ विचारवंत श्री. ज.द. जोगळेकर

ज्येष्ठ विचारवंत व साहित्यिक श्री. ज.द.जोगळेकर यांचे दिर्घ आजाराने दिनांक १५ जुलै, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९४ वर्षांचे होते.

### तबलावादक श्री. तात्या देवळेकर

जुन्या पिढीतील पट्टीचे तबलावादक पंडित रमाकांत शंकरराव तथा तात्या देवळेकर यांचे प्रदीर्घ आजाराने दिनांक १७ जुलै, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८६ वर्षांचे होते.

### गायिका मुबारक बेगम

हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिध्द गायिका मुबारक बेगम यांचे दिर्घ आजाराने दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६० वर्षांच्या होत्या.

### प्रख्यात चित्रकार एस.एच.रझा

भारतीय आधुनिक कलेच्या क्षेत्रातील प्रख्यात चित्रकार एस.एच.रझा यांचे दिर्घ आजाराने दिनांक २३ जुलै, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९४ वर्षांच्या होत्या.

### माजी आमदार श्री. बाबुराव आडसकर

ज्येष्ठ नेते माजी आमदार श्री. बाबुराव आडसकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८९ वर्षांचे होते.

### श्री. बी.आर.खेडकर

ज्येष्ठ शिल्पकार श्री.बी.आर.खेडकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक १३ ऑगस्ट, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते.

### श्री. वि.ग.कानिटकर

ज्येष्ठ साहित्यिक श्री.वि.ग.कानिटकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते.

### प्रा. भगवान भोईर

दलित साहित्यिक,ज्येष्ठ विचारवंत शिल्पकार प्रा. भगवान भोईर यांचे अल्पशा आजाराने दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी निधन झाले.

### डॉ. दाऊद दळवी

ज्येष्ठ इतिहासतज्ञ डॉ. दाऊद दळवी यांचे प्रदीर्घ आजाराने दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७९ वर्षांचे होते.

### श्री. शंकर बडे

ज्येष्ठ साहित्यिक बाबासाहेब उर्फ शंकर बडे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६८ वर्षांचे होते.

### श्री. शरद राव

ज्येष्ठ कामगार नेते श्री. शरद राव यांचे प्रदीर्घ आजाराने दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७५ वर्षांचे होते.

### श्री. राम कदम

कवी श्री. राम कदम यांचे वृध्दापकाळाने दिनांक ९ सप्टेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते.

### श्रीमती लीलाताई परूळेकर

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती लीलाताई परूळेकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक १३ सप्टेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८० वर्षांच्या होत्या.

### श्री. नंदू होनप

ज्येष्ठ संगीतकार श्री. नंदू होनप यांचे हृदयविकाराने दिनांक १८ सप्टेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६४ वर्षांचे होते.

### डॉ. विद्याधर करंदीकर

ज्येष्ठ साहित्यिक, कवी डॉ. विद्याधर करंदीकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजी निधन झाले.

### श्री. संगीत दाते

ज्येष्ठ गायक यांचे पुत्र श्री. संगीत दाते यांचे आजारपणामुळे दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ४८ वर्षांचे होते.

### श्री. पंडितअण्णा मुंडे

भाजपचे दिवगंत नेते गोपीनाथ मुंडे यांचे ज्येष्ठ बंधू व विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांचे वडील श्री. पंडितअण्णा मुंडे यांचे दिर्घ आजाराने दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७५ वर्षांचे होते.

### श्री. लक्ष्मण भांड

ज्येष्ठ चित्रकार श्री. लक्ष्मण भांड यांचे आजारपणामुळे दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८८ वर्षांचे होते.

यानंतर अधिसभा सदस्यांनी वरील मान्यवरांच्या तसेच मुंबई विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या दु:खद निधनाबद्दल एक मिनीट उभे राहून श्रंध्दाजली अर्पण केली.

यांनतर अध्यक्षांनी कार्यक्रमपत्रिकेवरील बाब क्र. १. अधिसभेपुढे मंजुरीसाठी मांडली.

बाब क्र. १. दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी झालेल्या अधिसभेच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त संमत करणे.

इतिवृत्ताबाबत काही सूचना असतील तर आपण सुचवाव्यात त्यांचा समावेश इतिवृत्तामध्ये करण्यात येईल, असे कुलसचिवांनी सभासदांना सांगितले.

ठराव : इतिवृत्त सभेपुढे सादर केल्यावर सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

बाब क्र २: सुधारित अर्थसंकल्प

कुलसचिवांनी मा. कुलगुरूंना सुधारित अर्थसंकल्पाबद्दल सभेला अवगत करण्याची विनंती केली.

मा. कुलगुरू - सन्माननीय सदस्य आपल्याकडे आपण जो अर्थसंकल्पीय अंदाज गेल्या वर्षी मांडलेला होता. तो एका ऐतिहासिक स्वरूपात मांडू शकलो होतो ज्या बदद्ल गेल्या वर्षी आपण त्याच खुप कौतुक केले होते. विषद केलेल्या गोष्टींप्रमाणे आपला खर्चाचा आणि जमेचा काही अंदाज आहे त्यानुसार आपला खर्च आणि त्याचा विनयोग चालू आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये ब-याचश्या बजेट हेड्समध्ये आपण ज्या रकमेच अंदाजपत्रक मांडले होत त्यानुसार खुप कमी प्रमाणामध्ये खर्च झालेला आहे तरी सुध्दा त्याचा पूर्ण आढावा अजून आम्ही घेतलेला नसल्यामुळे आम्ही त्याबददल आता या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये काही बदल सुचवत नाही आहोत. तथापि तळेरेला जे आपलं मॉडेल कॉलेज आहे त्या मॉडेल कॉलेजमध्ये साधारणपणे ४ लाख रूपये जास्तीचा एक आढावा घेतल्यानंतर असा अंदाज घेतला की ती रक्कम आपल्याला लागणार आहे येत्या मार्चपर्यंत त्याच्यामध्ये त्या स्वरूपातच व त्या संदर्भातच फक्त आपण एक बदल प्रस्तावीत करत आहोत त्या व्यतिरिक्त गेल्या वर्षी जेंव्हा हा अर्थसंकल्पीय अंदाज मांडला होता; ५४ कोटी रूपयांपासून ६३ कोटी रूपये सरप्लसमध्ये आपण मांडू शकलो होतो त्याच्या अनुषंगाने जी काही रक्कम आपल्या खात्यामध्ये येणार आहे त्यादृष्टीने आपले प्रयत्न सुरू आहेत आणि त्रुटितील फरक आहे तो या वर्षी आपण नक्कीच भरून काढणार आहोत. त्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत आणि त्यामध्ये नक्कीच समाधान वाटेल अशा प्रकारची कामगीरी विद्यापीठाकडून होईल.

गेल्या काही महिन्यांमध्ये सावंतवाडीमध्ये कुडाळ तालुक्यामधली साधारणपणे २५ एकर जमीन शासनाने प्रतिवर्ष नाममात्र १ रूपया दराने ३० वर्षांसाठी ती आपल्याला लिज या स्वरूपात मिळालेली आहे तर त्याच्यासाठीची आपण अंदाजपत्रकामध्ये रक्कमेची तरतुद केलेली आहेच पण त्यानंतरच्या गेल्या काही महिन्यांच्या काळामध्ये अशा प्रकारचा एक प्रस्ताव आपण शासनाला सादर केला आणि तो प्रस्ताव म्हणजे कळवा ठाणेच्या जवळ असलेल्या ठिकाणी १४ एकर जमीन शासन आपल्याला नाममात्र दराने देऊ करत आहोत त्याविषयीचा प्रस्ताव शासनाला सादर केलेला आहे आणि त्याच्यामध्ये लवकरच शासन निर्णय निघण्याची शक्यता आहे.

त्याच्याबद्दलचा एक अंदाजपत्रकामधली एक तरतुद आपण त्या वेळेला करू आणि त्या बद्दल आपल्याकडुन त्याची मान्यता घेऊ; त्याचबरोबर विद्यापीठाने स्वत:च्या पायावर उभे रहावे यासाठी वेगवेगळया गोष्टी आपण करत आहोत.

माझ एक स्वप्न आहे. ज्या विद्यापीठाला १५९ वर्षांची परंपरा आहे त्या विद्यापीठाच्या वार्षिक अंदाजपत्रकाएवढी रक्कम सुद्धा आपल्याकडे गंगाजळीमध्ये जमा नाही; ज्याला आपण कॉरपस फंड म्हणतो आणि त्याच्या तुलनेमध्ये हार्वर्ड विश्वविद्यालय २५९ हजार कोटी एवढी रक्कम त्यांच्याकडे दाननिधी म्हणून उपलब्ध आहे तर आपल्याकडे अस का होऊ शकत नाही?

तर त्यासाठी आपण दोन गोष्टी प्रस्तावीत केल्या होत्या. एक म्हणजे विद्यापीठाकडे स्वत:चा कमीत-कमी अडीच-तीन हजार कोटीचा दाननिधी असा असावा की ज्यातुन आपल्याला विद्यापीठाच्या पायाभुत सुविधांचा विकास करता येईल आणि दुसरे म्हणजे साधारणपणे हजार कोटी दाननिधी आपल्याला निर्माण करता याव्यात की ज्या ग्रॅन्टचा विनीयोग एका वेगळया पध्दतीने विद्यापीठाच्या विकासासाठी करता येऊ शकेल.

दोन गोष्टींचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी फ्रेंड्स ऑफ मुंबई युनिर्व्हसिटी नावाचे एक व्यासपीठ आपण लॉंच करत आहोत सेक्शन ८ कंपनी म्हणून त्याची नोंदणी होईल ज्याच्यामध्ये आपले आदरणीय राज्यपाल कुलपती आपल्या विश्वविद्यालयचे आणि आदरणीय मुख्यमंत्री हे मुख्य आश्रयदाता असतील आणि शिक्षणमंत्री हे प्रिंसिपल आश्रयदाता असतील; आपल्या विद्यापीठाचे कुलगुरू त्याचे एक दुसरे आश्रयदाता असतील आणि त्याचबरोबर एक व्यवस्थापन मंडळ असेल की ज्याच्यामध्ये समाजाच्या विविध स्तरातील अग्रगण्य व्यक्तींना त्याच्यामध्ये सामावून घेणार आहोत.

फ्रेंड्स ऑफ मुंबई युनिर्व्हसिटी एवढयासाठी की ही माजी विद्यार्थी संघटनेचा भाग नसेल; आपली माजी विद्यार्थी संघटना अस्तित्वात आहे आणि त्याच्यातून उभा केला जाणारा पैसा हा कॉर्पसच्या स्वरूपात जमा होतो पण या फ्रेंड्स ऑफ मुंबई युनिर्व्हसिटीच्या माध्यमातून जो पैसा उभा राहील त्याला आपण दाननिधी असे म्हणणार आहोत; तो निधी त्या फ्रेंड्स ऑफ मुंबई युनिर्व्हसिटीचे काही व्यवस्थापन मंडळ असेल त्यांच्याच अधिकारामध्ये ती रक्कम कशापध्दतीने खर्च होईल? याचा निर्णय घेतला जाणार असल्यामुळे विद्यापीठाचा त्या रक्कमेवर काहीच अधिकार नसणार आहे. विद्यापीठाला १६० वर्ष पूर्ण होणार आहेत त्यामुळे या वर्षीच उद्दिष्ट या माध्यमातुन १६० कोटी रूपयांच ठेवलेले आहे. अतिशय निरपेक्ष भावनेने हा फंड आपण निर्माण करायच ठरवलेले आहे.

आपल्याकडे एक प्रस्ताव होता एम.एम.आर.डी.ए.चा की ज्यांचा एक प्रस्तावीत उड्डाणपूल आपल्या कंपाऊंड वॉलला लागून एशियन हार्ट हॉस्पिटल पासून वेस्टर्न एक्सप्रेस हायवे पर्यंत बांधावा. त्याचे जे खांब आहेत ते आपल्या कंपाऊंड वॉलच्या बाहेरच्या बाजूने जाणार आहेत. उड्डाणपूलाची एक बाजू आपल्या जमीनीचा ४५ फुटाचा पट्टा ऐरीयली व्यापला जाणार आहे. त्यामुळे त्याच्यातुन आपल थेट काही नुकसान होणार नाही.

ऐरीयली हा भाग व्यापला असल्यामुळे शासनाने एम.एम.आर.डी.ए.च्या कॉन्सिल मध्ये हा निर्णय घेतला आहे. विद्यापीठाची परवानगी मिळाल्याशिवाय या प्रस्तावावर विचार करायचा नाही. मग तो प्रस्ताव माझ्याकडे पाठवण्यात आला. एम.एम.आर.डी.ए कडे प्रेजेंटेशनमध्ये या विषयीच्या अनेक योजना त्या दिवशी प्रेजेंटेशनमध्ये मांडल्या.

मुंबई विद्यापीठाची इतकी जुनी परंपरा आहे परंतु आज आमच्या विद्यार्थ्यांना राहायला पुरेशी वसतीगृह नाहीत आमच्याकडे चांगले शिक्षक जे मुंबईमध्ये वास्तव्य करणारे नसतील असे चांगले शिक्षक येऊ शकत नाही कारण आपण त्यांना साधे घर सुध्दा देऊ शकत नाही किंवा आमच्याकडे या गेल्या ४० वर्षांमध्ये ज्या इमारती बांधल्या गेल्या त्यापैकी ६० टक्के इमारतींना

अजून ओ.सी. मिळू शकलेली नाही आणि नवीन विभाग तयार झालेले आहेत पण त्यांना जागा नाही. विद्यापीठाचे स्वत:चे गेस्टहाऊस नाही; विद्यापीठाचे स्वत:च म्युझीयम नाही अशा प्रकारच्या अनेक गोष्टी किंवा विज्ञान विभागाची एखादी कलेक्टीव बिल्डिंग असावी की ज्याला ८ भुजा असतील आणि मध्ये कोर्टयार्ड ओपन असेल म्हणजे सगळे विज्ञान विभाग एकाच ब्लॉक मध्ये आपल्याला बांधता येऊ शकतील. अशाप्रकारच्या अनेक योजना त्या दिवशी त्या प्रेजेंटेशनमध्ये मांडल्या

१९ मे ला एम.एम.आर.डी.ए. बरोबर एम.ओ.यु. साईन केले. त्याच्यामध्ये या सर्व गोष्टींचा उल्लेख केला की, अशाप्रकारच्या अनेक योजना प्रत्यक्षामध्ये येणार असतील तर त्यातून उभ्या राहणा-या पैशांचा विनियोग फक्त या गोष्टी बांधण्यासाठी व्हावा. आपल्याला सांगायला मला अत्यंत आनंद होतो की, कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी शासन निर्णय आला आणि त्या निर्णयामार्फत आपल्याला टि.डी.आर शासन देऊ करत आहे त्याचा उल्लेख त्या शासन निर्णयामध्ये आहे. आपल्याला हा एक खुप मोठा टप्पा गाठता आलेला आहे अस मला वाटते. अशा पद्धतीने सर्वांगीण विकासाचा जर आराखडा तयार केला तर विद्यापीठाला खुप मोठी झेप घेता येऊ शकेल आणि हे सगळ आपल्या सर्वांच्या पाठींब्याने साध्य होते आहे. बजेटमध्ये आपण नमुद केले होते की, ४० आभासी वर्ग उभे करू. महाविद्यालयांना प्रस्ताव देता येईल. त्या संदर्भातील बजेट तर केलेले आहे. पण त्या ४० आभासी वर्गासाठी १ कोटी ८० लाख रूपये आपल्याला एका वेगळया माध्यमातून  मिळण्याची शक्यता आहे आणि तसा प्रस्ताव मी लवकरच सादर करणार आहे.

आईस सेंटर बाबत आपण उल्लेख केला होता (Information, Comminucation Entertainment Center) साठी गरवारे यांनी १५ हजार स्केअर फुट जागा आपल्याला ऑफर केलेली आहे आणि त्यासाठी टाटा ट्रॅस्ट ने आपल्याला कमिट केलेले आहे की, १,७५ कोटी आम्ही देतो.  तुम्ही तुमचा खर्च करू नका. अशा प्रकारे आपण १,७५ कोटी रूपये विद्यापीठाचे वाचवू शकलेलो आहोत.

आपल्या महाविद्यालयांकडून जी दरवर्षी संलग्नता शुल्क जमा करणे अपेक्षित असते, ते जमा होत नाही. आपल्याकडून काही दिरंगाई झाली असावी किंवा आपण पाठपुरवठा केलेला नाही. संलग्न महाविद्यालयांच्या माध्यमातून आपण चार्टर  अकाउंट फर्मची नियुक्ती केलेली आहे. त्यांच सुरूवातीच काम आता पुर्ण होत आले आहे व ते त्यांच विशिष्ट काम आता सुरू होईल, आपल्याला मे २०१७ पर्यंत अदांज येईल की, आपल्या महाविद्यालयांकडुन आपल्याला किती येणे अपेक्षित आहे. ती रक्कम साधारण १०० कोटीच्या घरात असू शकते. असा एक प्राथमिक अंदाज आहे. पण आपण ५० कोटी मिळतील असा ठरविले आहे. त्याच्यातून पण आपल्याला विद्यापीठ सक्षम करता येईल.

आपण एक कॅपची नविन बिल्डींग बांधत आहोत कॅम्पस मध्ये, ती संपूर्ण वातानुकुलीत करावी अशी माझी योजना आहे. जेणेकरून लांबून येणा-या शिक्षकांना ठराविक वेळेत त्यांनी पेपर तपासायचे काम करावे अशी अपेक्षा असते. त्यांना आपण साधा पंख्याचा वारा सुध्दा आपण

देऊ शकत नाही. राहण्याची तर सोय नाही आहे शिक्षकांच्या बाबतीत. पण आपला पुर्ण कॅंप विभागात विशेषत: जिथे शिक्षक पेपर तपासतात तो संपूर्ण वातानुकुलित करावे असे ठरविले आहे. अशा प्रकारे आपण जी सरप्लस रक्कम जी विद्यापीठासाठी आहे तर ती मिळविणार आहोत. त्याचा उपयोग आपल्याला या प्रकारे त्या विभागांना सक्षम करण्यासाठी करता येऊ शकेल. आपल्याला विद्यापीठाचे ब्रँडिंग करायचे आहे ते आपण अगोदरच कंत्राट दिलेले आहे आणि त्या माध्यमातून लवकरच विद्यापीठाचा चेहरा-मोहरा बदललेला दिसेल.

रूसा मधून आपल्याला काही अनुदान मिळाले होते. आपल्या विद्यापीठाच्या कलिना परिसरामधल्या ६ ऑडिटोरियमचे डिजीटल ऑडिटोरियम मध्ये रूपांतरीत करण्यात येईल. जेणेकरून प्रत्येक हॉल सिनेमागृहा सारखा अद्यावत असेल आणि त्यांच्या माध्यमातून आपण आभासी वर्गाच्या माध्यमातून काही कार्यक्रम प्रसारित करतो. ते कार्यक्रम आपल्याला डिजीटल ऑडिटोरियमच्या माध्यमातून करता येईल.

आपल्या जमनालाल बजाजला आपण स्वायत्ता दिल्यानंतर त्यांचे नवीन बोर्ड स्थापन झालेले आहेत आणि जमनालाल बजाजची नविन वास्तू कलिना परिसरामध्ये होणार आहे. त्यासाठी आपण अडीच एकर जमीन देऊ केली आहे; त्यासाठी लागणा-या १४० कोटी खर्चापैकी, ११५ कोटी व्यवस्थापन मंडळाचे जे सदस्य आहेत डॉ. अजय पिरामल, डॉ.चंदा कोचर, डॉ. मुशीर काका, उदय कोटक आणि श्री. निरज बजाज हे त्यांच्या सी.एस.एस.आर. च्या माध्यमातून आणि त्यांच्या समूहातून एवढे पैसे उभे करणार आहेत.

अर्थसंकल्पामधील सुधारीत तरतुदी मा. कुलगुरूंनी सविस्तर सादर केल्या, ज्या गोष्टींचा त्यांनी आपल्या प्रस्तावात उल्लेख केला त्यासहीत डॉ. मंजिरी कामत यांनी मान्यता दिली.

कुलसचिव - बजेटच्या बाबतीत सुधारित ज्या काही तरतुदी केलेल्या होत्या त्यांच्यामध्ये काही सुधारित तरतुदी आहेत ते मी आपल्या समोर ठेवतो आहे. सरांनी त्यांचा अगोदरच उल्लेख केलेला आहे.

मा. कुलगुरू - आपल्याकडे दुर्देवाने शासनमान्य जी पदे आहेत ती खुप कमी आहेत. प्रशासकीय पदांमध्ये थोडीशी अडचण अशी आहे की, आपले सुरक्षा रक्षक कायम स्वरूपी साधारणपणे १२० आहेत. पण गेल्या काही वर्षामधले त्यातले सुरक्षा रक्षक जे निवृत्त झाले आहेत त्यांची पदे कायमस्वरूपी भरायची नाही असा एक शासनाचा आदेश आहे. त्याला अधिन राहून काम करायचे म्हटले तर आपल्याकडे सध्या हंगामी स्वरूपात १४४ सुरक्षा रक्षक आहेत; ५९ सुरक्षा रक्षक हे कायम स्वरूपी आहे; १४४ जे आहेत ते कधीतरी कायम स्वरूपी होऊ या हेतुने काम करत आहेत. पण आज आपल्याला आवश्यक असणारी सुरक्षा रक्षकांची संख्या ३५० पर्यंत पोहचली असल्यामुळे १४४ आणि ५९ यांची बेरीज केली तर आपण २०३ च्या पुढे जाऊ शकत नाही; १०० सुरक्षा रक्षक हे बाहेरचे कंत्राट देऊन नेमले आहेत; त्याच्यामध्ये आपली आर्थिक तरतुद होती ती एक कोटीची होती. पुढच्या ६ महिन्यासाठी तरतुद करावी लागणार आहे; आतापर्यंत आपण ३५० न भरता ३०० वरच काम भागवत आहोत ५० अतिरिक्त सुरक्षा रक्षकांची गरज असून सुध्दा आपण भरले नाहीत. अशा परिस्थिती मध्ये बाहेरच्या एजन्सीकडून

घेतलेले १०० सुरक्षा रक्षकांचे आणि आपला चालू पगार १ कोटी २० लाखाची आपली रक्कम संपली असल्यामुळे पुढच्या ६ महिन्यासाठी तरतुद करावी लागणार आहे; ती अजून सव्वा कोटीची तरतुद करावी लागणार आहे. त्याचाही बजेट सप्लीमेंटमध्ये उल्लेख करावयाचा आहे. तीन गोष्टी, पहिली कळव्याच्या जागेचा ताबा जर लवकर मिळाला तर आपल्याला तिथे कंपाऊंड वॉल बांधावी लागेल त्यासाठी २५ लाखाची तरतुद करावी लागेल; दुसरी तळेरीच्या महाविद्यालयांसाठी ४ लाखाची अतिरिक्त तरतुद; तसेच तीसरी सुरक्षा रक्षकांच्या पदांसाठी १ कोटी २० लाखाची तरतुद आपण प्रस्तावित करणार आहोत. या अनुषंगाने आपल्याला आणखी काही तरतुदी अर्थसंकल्पामध्ये कराव्या लागतील.

कुलसचिव - माननीय सदस्यांना काही सांगायचे असेल तर सांगावे.

डॉ. अनिल कर्णिक – आजचे भाषण ऐकून आम्हाला आंनद झाला. विद्यापीठाने जी स्वप्न बघितली, स्वप्नांची पुर्तता होण्याची ही चिन्हे आहेत. अभिसभचे सदस्य, विद्वत परिषदेचे सदस्य व शिक्षक व कर्मचारी यांना खात्री आहे की, येत्या काही वर्षात मुंबई विद्यापीठ हे सर्वोत्कृष्ट विद्यापीठ होईल, अशी अपेक्षा आहे.

डॉ. मंजिरी कामत – मा. कुलगुरूंनी आपल्याला सांगितले आहे की, फ्रेंडस ऑफ युनिर्व्हसिटी ही एक नाविन्यपूर्ण कल्पना आहे. जे सांगितले त्याबद्दल तुमचे अभिनंदन अशीच आपल्या विद्यापीठाची वाढ होऊ दे, अशी आमची आशा आहे.

कुलगुरूंनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

Confirmed

कुलगुरू

कुलसचिव